संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# पुण्यात वणवे लावणारे आगमाफिया कोण?

**उन्हाळ्यामध्ये** आगी लागण्याचे प्रकार वाढतात. किंवा आगी लागण्यासाठी अथवा लावण्यासाठी अनेकांना उन्हाळा हे एक निमित्त सापडत असते. मुंबईत हा प्रकार सर्रासपणे होतो. मोक्याच्या भूखंडांवर असलेल्या झोपडपट्ट्यांना, चाळींना किंवा बंद पडलेल्या गिरणी कारखान्यांना नेमक्या उन्हाळ्यातच आगी लागतात. विशेष म्हणजे एकाच उन्हाळ्यात या आगी लागून चालत नाहीत. कारण तेवढ्या एका निमित्ताने किंवा प्रकाराने तो भूखंड मोकळा होत नाही. काही वर्ष सातत्याने हे उद्योग चालू ठेवले जातात. आणि मग वारंवार हे प्रकार झाल्याने संबंधित भूखंड किंवा तो परिसर मोकळा करून घेण्याच्या राजकीय आणि माफिया हालचालीही सुरु होतात. आतापर्यंत जागा बळकावण्याकरीता असे कटकारस्थान करणाऱ्यांना भूमाफिया म्हटले जात होते. कारण मुंबईप्रमाणेच हा प्रकार आता राज्याच्या सर्वच भागामध्ये पाहायला मिळतो. वेगवेगळे भूखंड बळकावण्याकरीता आगी लावण्याप्रमाणेच इतरही डाव खेळले जातात. त्यामुळे तिथल्या रहिवाशांना धमक्या देण्यापासून ते सरकारी अधिकारी किंवा पोलिसांना हाती धरून तिथल्या रहिवाशांना हुसकावून लावण्याचाही प्रकार घडतो. मुंबईबाहेरच्या अनेक भागात तर आता याच उन्हाळ्याचे निमित्त साधून जागा बळकावण्याचे कट यशस्वी होताना दिसत आहेत. पुणे, नागपूर, औरंगाबाद अशा मोठ्या शहरांमध्ये फारशा मोकळ्या जागा उपलब्ध नाहीत. आणि मग त्या त्या परिसरातल्या वनजमीनी आपल्या खिशात घालण्याकरीता हेच भूमाफिया आता आगमाफीया होऊन काम करताना दिसत आहेत. आणि याचे ताजे उदाहरण पुण्यामध्ये पाहायला मिळाले. केवळ मार्चच्या एका महिन्यात पुणे परिसरातल्या वनजमीनीवर तब्बल चारशे ठिकाणी वणव्यांची नोंद केली गेली आहे. तर गेल्या तीन महिन्यात पुण्याजवळच्या काही महत्वाच्या परिसरामध्ये साडेपाचशेपर्यंत वणव्यांचे प्रकार नोंदवले गेले. ज्या ज्या वनजमीनींवर हे वणवे लागले तो सगळा परिसर बघितल्यानंतर कालांतराने या जागा हडप करण्याचाच मोठा डाव असल्याचे स्पष्ट होते. उन्हाळ्यामध्ये जंगल परिसरात हे वणवे पसरतात हे कितीही गृहित धरले तरी त्यांचे प्रमाणही एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच असते. चारशे ते पाचशे वणव्यांचे प्रकार घडणे हा निश्चितच एक मोठा डाव म्हणावा लागतो. केवळ तो जंगलातला वणवा आहे. असे म्हणून त्याकडे दुर्लक्ष करणे अत्यंत धोक्याचे ठरू शकते.

### सगळ्या मोक्याच्या वनजमीनी

पुण्याजवळच्या ज्या परिसरात हे आगीचे प्रकार घडले. त्या यादीवर एक नजर टाकली तरी सहजपणे त्यामागचे कारस्थान लक्षात येते. पानशेत, वेल्हे, सासवड, सिंहगड, लोणी काळभोर, पौड, चाकण, आणि हडपसर या भागामध्ये वनजमीनींवर वणव्यांचा कहर माजवला गेला. एकाच महिन्यात याच विशिष्ट भागात साडेपाचशेवेळा वणवे लागत असतील तर तो फार मोठ्या कारस्थानाचा भाग म्हणावा लागतो. म्हणून त्याची तितकीच सखोल चौकशी झाली पाहिजे. कालांतराने वारंवार आगी लागलेले हे भाग राजकारण्यांना हाताशी धरून मोकळे केले जातात. विशेष बाब म्हणून किंवा कायद्यामध्ये दुरुस्ती करून या जमीनी निवासी कारणांसाठी वापरात आणल्या जातात. आणि हे सगळे घडवून आणणारा मोठा वर्ग सतत काम करीत राहतो. यामागचे अर्थकारणही तितकेच जबरदस्त असते. पुणे परिसरात मुंबईप्रमाणेच आता इतके मोकळे भूखंड उपलब्ध नाहीत. तरीदेखील घरांची मागणी लक्षात घेऊन किंवा फार्म हाऊससारख्या कल्पना राबवण्यासाठी अशा वनजमीनी उपयुक्त ठरू शकतात. ज्याठिकाणी हे वणवे लागले तिथे जागेला भविष्यात चांगला भाव येऊ शकतो. केवळ निवासीच नव्हे तर व्यापारी संकुलांसाठीसुध्दा हे भूखंड उपयोगात आणता येऊ शकतात. म्हणूनच जागा बळकावण्याकरीता केवळ भूमाफिया काम करतात असे नाही. तर आता आग माफिये अशीही एक नवी जमात अस्तित्वात आलेली दिसते. त्याशिवाय इतक्या योजनापूर्वक आगी लागू शकत नाहीत. विशेषतः पुण्याजवळच्या या भागांमध्ये यापूर्वी इतक्या मोठ्या संख्येने वणवे लागण्याचा प्रकार घडलेला नाही. याचाच अर्थ निवडणुकीच्या धामधुमीत हे प्रकार घडवून आणायचे आणि त्यानंतर आपली उद्दीष्टे साध्य करून घ्यायची. हा त्यामागचा पुढचा डाव आहे. राज्याच्या इतर कोणत्याही भागातल्या वनजमीनीवर असे किंवा इतक्या मोठ्या संख्येने वणवे लागत असताना नेमक्या याच ठिकाणी हे प्रकार घडावेत याबद्दल कोणालाही शंका येऊ शकते.

### त्रिकूटाची कूटनीती

सध्या तर निवडणुकांचा हंगाम सुरु असल्याने मंत्री काय किंवा अधिकारी काय कोणीही त्याकडे गांभिर्याने लक्ष देणार नाही. उलट आचारसंहितेचे कारण सांगून हे प्रकार दडपण्याचाच प्रयत्न होईल. अजून तर खऱ्या वैशाख वणव्याला सुरुवात व्हायची आहे. एप्रिल किंवा मे महिन्यातला उन्हाचा तडाखा सहन करण्यापलिकडे जातो. त्यापूर्वीच आगींचा किंवा वणव्यांचा हा धडाका लावला जात असेल तर त्यामागचे अर्थकारण कठोरपणे शोधले गेले पाहिजे. स्थानिक राजकारणी, बिल्डर लॉबी आणि सरकारी अधिकारी अशा या त्रिकूटाची ही सगळी कूटनीती असते. समजा अगदी उन्हामुळेच इतक्या मोठ्या संख्येने वणवे लागत असतील असे गृहित धरले तरी ते लागू नयेत किंवा त्याच्यावर तातडीने नियंत्रण आणावे अशी कोणती उपाययोजना वनखात्यातर्फे केली जाते हेही स्पष्ट व्हायला हवे. राज्याचे वनमंत्री हे चंद्रपूरसारख्या आदिवासी भागाचे प्रतिनिधीत्व करतात. त्यांच्या मतदार संघात अधिक वनविभाग येतो. आणि विदर्भात पुण्यापेक्षा जास्त कडक उन्हाळा असतो. तिथे अशा घाऊक प्रमाणात वणवे लागत नाहीत. पण तुलनेने हवामान थंड असलेल्या पुण्यात वणव्यांनी धुमाकूळ घालावा याच्याइतके वेगळे आश्चर्यही नाही. यासंदर्भात वनविभागाची तत्परताही तपासायला हवी. कारण धन मिळवण्यासाठी वन जाळणारे नेमके हे माफिया कोण आहेत. हे तरी लोकांसमोर येईल.